**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** परभणी  **P.S.(ठाणे):** मोधा
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0278  **Year (वर्ष):** 2024
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 04/06/2024 00:14

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** सोमवार  **Date From (दिनांक पासून):** 27/05/2024
      **Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/05/2024
      **Time From (वेळेपासून):** 12:15 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 13:24 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
      **Date (दिनांक ):** 03/06/2024  **Time (वेळ):** 23:50 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
      **Entry No. (नोंद क्र.):** 070
      **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/06/2024 23:50 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
      पश्चिम, 02 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** उप अधिक्षक, भुमीअभिलेख कार्या,परभणी येथील कक्षामध्ये

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
      **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
      **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मनोज प्रभाकरराव खोटारे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1971

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लट क्रमांक 11 ,शिवराम नगर ,परभणी ,मोधा,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्लट क्रमांक 11 ,शिवराम नगर ,परभणी ,मोधा,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9834347273

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दत्तु रामभाऊ सोनवणे | | | 1. लोकमान्य नगर, परभणी,,मोधा, परभणी,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 03/06/2024.

मी मनोज प्रभाकरराव खोटारे, वय 53 वर्ष, धंदाः नोकरी रा. शिवराम नगर, प्लॉट क्रमांक 11 परभणी, ता.जि. परभणी, मो.नं.9834347273.

समक्ष पोलीस स्टेशन नवामोंढा, जि. परभणी येथे हजर येवून फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असून शिक्षक म्हणुन नोकरी करतो. मी ए.सी.बी. कार्यालय परभणी येथे दि.27/05/2024 रोजी तक्रार दिली की, मा. जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, परभणी यांचे न्यायालयाचे आदेशाप्रमाणे माझे सर्व्हे नंबर 303 मधील प्लॉट क्र 11 ला नवीन मिळकत पत्रिका क्रमांक देवून माझे नावे नविन पी.आर.कार्ड मिळावे म्हणून मी उपअधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, परभणी येथील कार्यालयात दि. 29/11/2023 रोजी लेखी अर्ज व त्यासोबत आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे जोडून अर्ज सादर केला होता. त्यानंतर मी काही दिवसानंतर सदर कामाबाबत उपअधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, परभणी येथे जावून उपअधिक्षक श्री सोनवणे यांना भेटलो असता त्यांनी 'तुमचे काम करून घेवूत'असे बोलले. त्यानंतर मी 2 ते 3 वेळेस कार्यालयात गेलो असता त्यांनी आम्ही मराठा आंदोलन कुणबी जात बाबत कार्यालयीन माहिती गोळा करण्याचे कामात व्यस्त आहोत तुम्ही नंतर या असे कळविले. त्यानंतर मी लोकसभा निवडणूक झाल्यानंतर दि.06/05/2024 रोजी उपअधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, परभणी येथे जावून उपअधिक्षक श्री सोनवणे यांना भेटलो असता त्यांनी 'व्ही.सी. चालू आहे. तुम्ही उदया या'असे कळविले. त्यानंतर मी दि. 07/05/24 रोजी पुन्हा कार्यालयात जावून उपअधिक्षक श्री सोनवणे यांची सायंकाळच्या सुमारास भेट घेतली. सदरवेळी त्यांनी मला 'सदर काम मी करून घेतो, त्यासाठी तुम्हांला मला 10,000/- रूपये द्यावे लागतील'असे म्हणुन रक्कम मागीतली आहे. त्यावर मी त्यांना सदर पैसे हे फी आहे का? असे विचारले असता त्यांनी मला काहीच उत्तर दिले नाहीत. सदर रक्कम ही त्यांनी लाच म्हणून मागत असून माझे कामासाठी मला त्यांना लाच द्यायची मुळीच इच्छा नाही. माझे त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचे पैशाचे देवाण घेवाणीचे व्यवहार नाहीत. मी आज दि. 27/05/2024 रोजी उपअधिक्षक श्री सोनवणे यांना भेटणार आहे. भेटी दरम्यान त्यांनी माझे कामानिमित्त लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी. अशी लेखी तक्रार दिली. त्यावरून मा. पोलीस उप अधिक्षक श्री. इप्पर साहेब यांनी पोनि श्री. जकिकोरे, एसीबी परभणी यांना पुढील कार्यवाही करणे बाबत सांगीतल्याप्रमाणे त्यांनी तात्काळ 1) श्री संतोष पांडुरंग भाग्यवंत व 2) श्री नरसिंह बालासाहेब आळसे यांना शासकीय पंच म्हणुन उपलब्ध करून घेतले. सापळा अधिकारी यांनी दोन्ही पंचांची व माझी ओळख करून दिली. पंचाना मी तक्रारीबाबत तोंडी माहिती दिली. त्यानंतर मला व दोन्ही पंचांना सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांची ओळख करून दिली. त्यानंतर प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरूवात करण्यात आली. दि. 27/05/2024 रोजी 12.15 ते 13.24 वाजेपर्यंत करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान मी व पंच क्र. 1 संतोष भाग्यवंत असे व्हाईस रेकॉर्डरसह लोकसेवक सोनवणे साहेब यांना भेटण्यास उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, परभणी येथे गेलो. तेथे माझी व सोनवणे साहेब यांची पंच क्र. 01 संतोष भाग्यवंत यांचे समक्ष भेट झाली. भेटी दरम्यान सोनवणे साहेबांसोबत माझे कामासंबंधी चर्चा झाली त्यादरम्यान चर्चेवेळी त्यांनी मला 'बोला काय म्हणता'असे विचारले. तेंव्हा मी त्यांना 'थोड बहुत कमी करा'असे म्हणालो असता त्यांनी 'तुम्हीच सांगा' असे सांगीतले. तेंव्हा मी त्यांना 'सहा हजारात करून घ्या' असे म्हणालो. तेंव्हा त्यांनी मान हलवुन संमती दिली व त्यानंतर त्यांनी 'खूने मॅडमला तुम्हाला योग्य वाटेल असे काही तरी करा' असे म्हणाले. तेंव्हा मी 'मॅडमला एक हजार देतो'असे म्हणालो असता त्यांनी संमती दर्शवली. त्यावेळी मी त्यांना माझे कामासाठी काय फीस लागते का असे विचारले असता त्यावर त्यांनी फीस नाही लागत असे म्हणाले. तसेच मला खुणे मॅडमला भेटण्यास सांगीतले. मी सांगीतल्याप्रमाणे खुणे मॅडमला भेटलो असता त्यांनी मला माझे कामासाठी कोणत्याही प्रकारच्या लाचेची मागणी केली नाही. एकंदरीत लोकसेवक सोनवणे यांनी माझे सर्व्हे नंबर 303 मधील प्लॉट क्र 11 ला नवीन मिळकत पत्रिका क्रमांक देवून माझे नावे नविन पी.आर.कार्ड बनवुन देण्यासाठी स्वतःसाठी 6,000/- रूपये व खुणे

मॅडमसाठी 1,000/- रूपये असे एकुण 7,000/- रुपये लाचेची मागणी पंचासमक्ष केली. पडताळणी कार्यवाही दरम्यान माझे व लोकसेवक सोनवणे यांचे पंच क्र. 1 संतोष भाग्यवंत यांचे समक्ष झालेले संभाषण डिजिटल व्हाईस रेकॉर्डरच्या सहाय्याने मेमरीकार्डमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे. तसा सविस्तर पडताळणी पंचनामा सापळा अधिकारी यांनी केलेला आहे.

त्यानंतर लागलीच सापळा अधिकारी यांनी लोकसेवक सोनवणे यांचेवर सापळा आयोजीत केला. लोकसेवक सोनवणे यांनी मला पडताळणी कार्यवाहीवेळी एकुण 7,000/- रूपये लाचेची मागणी केल्याने मी 7,000/- रू ज्यामध्ये 500/- रूपये दराच्या 14 नोटा लाच म्हणुन देण्याकरीता पंचासमक्ष हजर केल्या. सापळा कार्यवाही दरम्यान मला, पंचांना व सापळा पथकास प्रत्येकाच्या कामाबाबत सापळा अधिकारी यांनी सुचना दिल्या. तसेच अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे गुणधर्म व वापरा बाबत माहिती देवून त्याचे प्रात्यक्षीक करून दाखविण्यात आले. लाचेच्या 7,000/- रू ज्यामध्ये 500/- रूपये दराच्या 14 चलनी नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावून ती रक्कम माझेकडे देवून व्हाईस रेकॉर्डरसह मला व पंच क्र. 1 संतोश भाग्यवंत यांना लोकसेवक सोनवणे यांना लाचेची रक्कम देण्यासाठी त्यांचे भुमी अभिलेख कार्यालयात पाठविले. आमचे पाठोपाठ सापळा पथक निघाले. आम्ही भुमी अभिलेख कार्यालयात पोहचताच सापळा पथक आमच्यावर लक्ष ठेवून आजुबाजूला थांबले.

पंच क्र. 1 संतोष भाग्यवंत यांना लोकसेवक सोनवणे यांचे कॅबीनचे दारात थांबवुन कॅबीनमध्ये गेलो. माझे मागेच खुणे मॅडम कॅबीन मध्ये आल्या. त्यावेळी लोकसेवक सोनवणे यांनी खुणे मॅडमला माझे कामाबाबत विचारणा केली. त्यावेळी महिला कर्मचारी खुने यांनी प्रकरण बघाव लागेल, फाईल शोधुन काम करून देते असे सांगीतले व त्या निघुन गेल्या. त्यानंतर मी लोकसेवक सोनवणे यांना माझे काम करून देणे बाबत विनंती केली. तसेच त्यांना 'तुमचे देवुन टाकतो'असे म्हणालो असता त्यांनी 'नाही राहु दया... आता नको दोन-तीन दिवसांनी काम झाल्यावर द्या'असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना मॅडमला काम करून देण्यास सांगा असे म्हणालो असता त्यांनी 'त्यांना काय करा तुम्ही उदया परवा देऊन टाका काय ते मागेल ते म्हणजे लवकर करतील'असे सांगीतले. त्यामुळे मी तेथुन निघुन पंच क्र. 1 यांचे सह महिला कर्मचारी खुने यांचेकडे गेलो. त्यावेळी त्यांनी त्या कलेक्टर साहेबांच्या कामामध्ये व्यस्त असुन फाईल शोधुन ठेवते असे म्हणुन मला पुढच्या आठवडयात येण्यास सांगीतले. सदरवेळी लोकसेवक सोनवणे यांनी सांगीतल्याप्रमाणे मी खुणे मॅडमला 'तुमच काय हे ते देऊन टाकतो'असे म्हणालो असता त्यांनी पैशाची मागणी न करता पुढच्या आठवडयात येण्यास सांगीतले. मला पुढच्या आठवडयात येण्यास सांगीतल्याने सापळा कार्यवाही स्थगित करून दि. 03/05/2024 रोजी लोकसेवक सोनवणे यांची भेट घेवून सापळा आजमाविण्याचे सर्वानुमते ठरले. या कार्यवाही बाबतचा पंचनामा सापळा अधिकारी यांनी केला आहे. तसेच मला दि. 03/06/2024 रोजी सकाळी ए.सी.बी. कार्यालयात येण्यास सांगीतले.

दि. 27/05/2024 रोजी सापळा अधिकारी श्री. जकिकोरे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी आज दि. 03/06/2024 रोजी सकाळी ए.सी.बी. कार्यालय, परभणी येथे आलो. कार्यालयात पंच क्रमांक 1 संतोष भाग्यवंत व सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार हजर होते. सदरवेळी सापळा अधिकारी श्री. जकिकोरे यांनी मला श्री. बालासाहेब मुंजाजी कन्के यांची ओळख करून देवुन ते आजच्या कार्यवाही करीता श्री. नरसिंह आळसे यांच्या ऐवजी पंच क्रमांक 2 म्हणुन काम पाहणार असल्याचे सांगीतले. सापळा कार्यवाही दरम्यान पोलीस निरीक्षक श्री. जकिकोरे यांनी मला, पंचांना व सापळा पथकास प्रत्येकाच्या कामाबाबत सुचना दिल्या. तसेच दि. 27/05/2024 रोजी पोह/भुमकर यांनी प्रात्यक्षीक करून दाखविल्याप्रमाणे आज पुन्हा प्रात्यक्षीक करून दाखविले व मी दि. 27/05/2024 रोजी हजर केलेल्या 7,000/- रूपयांना ( ज्यामध्ये 500/- रू दराच्या 14 चलनी नोटा) पोह/भुमकर यांनी परत थोडे अॅन्थ्रासीन पावडर लावून लोकसेवक सोनवणे यांना देण्यासाठी माझे अंगावरील शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिश्यामध्ये व्यवस्थीत ठेवून दिली. त्यानंतर मी व पंच क्र. 1 संतोष भाग्यवंत असे ए.सी.बी. कार्यालयापासुन माझे मोटारसायकलने लोकसेवक सोनवणे यांना लाचेची रक्कम देण्यासाठी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरसह उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालयाचे परिसरात पोहचलो. सापळा पथक आमच्या पाठोपाठ आले व कार्यालयाचे आजुबाजूला आमचेवर लक्ष ठेवून थांबले. मी व पंच क्र. 1 भाग्यवंत असे उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालयाचे आत गेलो. तेथे लोकसेवक सोनवणे यांचे कक्षामध्ये गेलो असता ते मला बघताच खुर्चीवरून उठले व मला माझे काम झाले बाबत सांगीतले व देवुन टाका असे म्हणाले. त्यावर मी त्यांना माझे कडील रक्कम बाबत हाताचा

शारा करून खुनवले असता त्यांनी काय नाही काय नाही असे म्हणुन मॅडमला भेटण्यास सांगुन मॅडम कडुन नंबर घेवुन टाका असे म्हणाले. तेंव्हा मी खुने मॅडम बसत असलेल्या टेबलजवळ गेलो. खुणे मॅडम यांनी मला नवीन मिळकत पत्रीका क्रमांक 18308 दिला व ऑनलाईन पि.आर. कार्ड ची प्रिंट काढुन घेण्यास सांगीतली. त्यावेळी मी खुणे मॅडमला सोनवणे साहेबांनी आपल्याकडे देण्यास सांगीतले असे म्हणुन मी रक्कम देण्याबाबत खुणवले असता

त्यावेळी त्यांनी नाही म्हणुन नकार दिला. त्यामुळे मी लोकसेवक सोनवणे यांची भेट घेण्यासाठी त्यांचे कक्षाजवळ आलो असता ते कार्यालयात हजर नव्हते. मी तेथील कर्मचारी यांना विचारणा केली असता ते बाहेर गेले असल्याचे कळाले. त्यामुळे मी व पंच क्र. 1 भाग्यवंत एसीबी कार्यालयात परत आलो.
कार्यालयात माझे व लोकसेवक सोनवणे यांचे दरम्यान झालेले संभाषण व्हॉईस रेकॉर्डरच्या सहायाने एकण्यात आले. लोकसेवक सोनवणे यांची व माझी नंतर भेट न झाल्याने काही वेळाने पुन्हा एकदा लोकसेवक सोनवणे यांची भेट घेण्याचे ठरविण्यात आले.
त्यानंतर काही वेळाने पुन्हा एकदा कार्यवाहीस सुरवात करून मला व पंच क्र. 1 संतोष भाग्यवंत यांना लोकसेवक सोनवणे यांना लाचेची रक्कम देण्यासाठी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरसह 16.41 वाजता रवाना करण्यात आले. एसीबी कार्यालयातुन निघुन आम्ही दोघे उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालयाचे परिसरात पोहचलो. सापळा पथक आमच्या पाठोपाठ आले व कार्यालयाचे आजुबाजूला आमचेवर लक्ष ठेवून थांबले. मी व पंच क्र. 1 भाग्यवंत असे शासकीय इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालयाचे आत जात असतांना कार्यालयाचे मुख्य प्रवेश व्दारासमोरच लोकसेवक सोनवणे यांची व माझी भेट झाली.

CCTNS प्रणाली मध्ये प्रथम खबर मजकुर साठी 8000 शब्दांची मर्यादा असल्याने उर्वरीत फिर्याद वेगळ्या एक को-या कागदावर यासोबत जोडण्यात आली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

samadhan kisan chavare(I (Inspector)) / API **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): samadhan kisan ch.
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): API

पोलीस ठाणे अंमलदार
मोंढा पोलीस स्टेशन परभणी

त्यावेळी मी लोकसेवक सोनवणे यांना 'मॅडमला दिला सर नंबर' असे सांगीतले असता त्यांनी 'झालन तुमच काम, आता तुम्ही चकरा मारू नका' असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना 'ठरल्याप्रमाणे 6,000/- रूपये' असे म्हणालो असता त्यांनी मला मधातच थांबवुन 'काहीच नाही, विषय संपला, आपल काम झाल, काहीच गरज नाही' असे म्हणाले व लाच रक्कम न घेता तेथुन निघुन गेले. त्यावेळी मी व पंच क्र. 01 भाग्यवंत शासकिय इमारतीच्या खाली आलो व इमारती समोर एका झाडाजवळ थांबलेले सापळा अधिकारी श्री. जकिकोरे यांना हाताने इशारा करून बोलावुन घेतले. सदरवेळी पोशि/शेख जिब्राईल यांनी माझे कडील व्हाईस रेकॉर्डर काढुन घेवुन 16.55 वा. बंद केला. मी सापळा अधिकारी यांना सांगीतले की, लोकसेवक सोनवणे यांनी मागणी केलेली लाचरक्कम स्विकारण्यास नकार दिला आहे. तसेच आता काहीच गरज नाही, तुम्ही चकरा मारू नका असे सांगीतले आहे. त्यामुळे लोकसेवक सोनवणे यांना माझा संशय आला असावा त्यामुळे त्यानी माझे कडे पंचासमक्ष मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारलेली नाही आणि ते यापुढे सुध्दा माझे कडुन लाच रक्कम स्विकारणार नाहीत याची मला खात्री झालेली आहे.

त्यानंतर सापळा अधिकारी श्री. जकिकोरे यांनी पंच क्रमांक 02 कन्के व संपुर्ण सापळा पथकास बोलावुन घेतले. त्यानंतर आम्ही सर्वजन पहिल्या मजल्यावरील भुमी अभिलेख कार्यालयाजवळ गेलो असता. तेथे कार्यालयाचे मुख्य प्रवेशव्दाराजवळ थांबलेले लोकसेवक सोनवणे यांना सापळा पथकाने ताब्यात घेतले. त्यांना भुमी अभिलेख कार्यालयातील त्यांचे कक्षामध्ये नेण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री जकिकोरे साहेबांनी लोकसेवक सोनवणे यांना त्यांचे पुर्ण नाव गाव विचारले असता त्यांनी आपले नाव दत्तु रामभाऊ सोनवणे, वय 49 वर्ष, पद - उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, परभणी, रा. माउली निवास, अष्टविनायक नगर, अमृतधाम, पंचवटी, नाशिक, हल्ली मुक्काम लोकमान्य नगर, परभणी, ता. जि परभणी असे सांगितले.

तरी दि. 27/05/2024 रोजी 12.15 ते 13.24 वा. दरम्यान लोकसेवक दत्तु रामभाऊ सोनवणे यांनी उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, परभणी येथील त्यांचे कक्षामध्ये मला मा. जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, परभणी यांचे न्यायालयाचे आदेशाप्रमाणे माझे सर्व्हे नंबर 303 मधील प्लॉट क्र 11 ला नवीन मिळकत पत्रिका क्रमांक देवून माझे नावे नविन पी.आर.कार्ड देण्याकरीता स्वतःसाठी 6,000/- रूपये व त्यांचे अधिनस्त खुणे मॅडमचे नावे 1,000/- रूपये असे एकुण 7,000/- रू लाचेची मागणी केली व लाच रक्कम खुणे मॅडमला देणे बाबत मला वारंवार प्रोत्साहित केले. म्हणुन माझी दत्तु रामभाऊ सोनवणे, वय 49 वर्ष, पद - उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, परभणी, रा. माउली निवास, अष्टविनायक नगर, अमृतधाम, पंचवटी, नाशिक, हल्ली मुक्काम लोकमान्य नगर, परभणी, ता. जि परभणी यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे. म्हणून त्यांचे विरूध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता फिर्याद देत आहे.

माझी फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली आहे. मी ती वाचून पाहिली माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

फिर्याद दिली सही.

पोलीस ठाणे अमलदार
मोंढा पोलीस स्टेशन परभणी